अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. २२ सप्टेंबर २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ३५४ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


## भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यात आज पहिला वनडे




भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात शुक्रवारी पहिला एक दिवसीय सामना मोहाली येथे होत आहे. २५ सप्टेंबर रोजी दुसरा तर २८ सप्टेंबर रोजी तिसरा एक दिवसीय सामना होत आहे. पहिल्या दोन सामन्यासाठी रोहित शर्मा आणि विराट कोहली विश्रांती देण्यात आली आहे. के राहुल याच्याकडे कर्णधार पद सोपवण्यात आले आहे. ऑस्ट्रेलियाकडून पॅट कमिन्सकडे कर्णधार पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. दुपारी २ वाजता हा सामना सुरू होणार आहे.

## पुन्हा उलथापालथ... सभापती नार्वेकर दिल्लीत, भाजप श्रेष्ठींशी खलबते

# सत्तासुंदरी अजितदादांना पावणार?

सुराज्य / विशेष प्रतिनिधी

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटातील सोळा आमदारांच्या अपात्रतेवर निर्णय घेण्यास विलंब केल्याबद्दल सुप्रीम कोर्टाकडून कानपिचक्या मिळताच सभापती राहुल नार्वेकर हे गुरूवारी तातडीने दिल्लीला गेल्यामुळे राजकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे.१६ आमदार अपात्र ठरले तर पुढे काय? हा प्रश्न महायुतीच्या सत्तेत निर्माण झाला आहे.यदाकदा हे आमदार अपात्र ठरले तर पुढच्या सत्तेचा भाजपचा बी प्लॅन तयार असल्याचे सांगण्यात येते.त्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजितदादा पवार यांना सीएम करण्याची रणनीती आखली गेल्याचे सांगण्यात येते. गणेशोत्सवाच्या देखाव्यातही अजितदादांच्या शपथविधीचा सोहळा अजितदादांच्या समर्थकांकडून रंगवला गेल्याने सर्वत्र आश्चर्य व्यक्त केले जात आहे.राज्यात पुन्हा राजकीय उलथापालथ होण्याची चिन्हे दिसत आहेत.**




गेल्या काही दिवसांपासून संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून राहिलेल्या शिवसेनेतील १६ आमदारांच्या अपात्रतेबाबत लवकरच अंतिम निकाल येण्याची चिन्हे दिसत आहेत. न्यायालयाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह १६ आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय तातडीने घेण्याचे अप्रत्यक्ष निर्देश दिले होते. त्यानंतर नार्वेकर हे अचानक दिल्लीच्या दिशेने रवाना झाले. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

दिल्लीत नार्वेकर हे कोणाची भेट घेणार, हे सर्वप्रथम पाहावे लागेल. दिल्लीत राहुल नार्वेकर हे भाजपश्रेष्ठींशी शिवसेनेच्या १६ आमदारांच्या अपात्रतेबाबत चर्चा करणार का? या चर्चेनंतर भाजपश्रेष्ठी नार्वेकर यांना नेमक्या काय सूचना देणार, या सगळ्याची उत्सुकता राजकीय वर्तुळाला लागली आहे. राहुल नार्वेकर यांची ही दिल्ली भेट १६ आमदारांच्या अपात्रतेबाबत अंतिम निर्णय येण्याच्यादृष्टीने महत्त्वपूर्ण मानली जात आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिवसेनेच्या १६ आमदारांना पक्षांतरबंदी कायद्यातंर्गत अपात्र ठरवल्यास एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदावरुन पायउतार व्हावे लागणार का, याकडेही अनेकांच्या नजरा लागल्या आहेत. त्यामुळे नार्वेकर यांची ही दिल्लीवारी सर्वार्थाने महत्त्वाची मानली जात आहे.

दरम्यान, राहुल नार्वेकर यांनी मात्र दिल्लीवारीबाबत या सर्व शक्यता फेटाळल्या आहेत. माझा दिल्ली दौरा हा पूर्वनियोजत होता. त्यासाठीच मीं आज दिल्लीला जात आहे. १६ आमदारांच्या अपात्रतेसंदर्भात घडणाऱ्या इतर गोष्टींकडे तुम्ही लक्ष देऊ नका. तुम्ही फक्त माझ्या निर्णयाकडे लक्ष द्या. हा निर्णय घेताना कोणताही दिरंगाई होणार नाही. त्याचप्रमाणे निर्णय घेताना घाईही केली जाणार नाही, जेणेकरुन त्यामुळे कोणताही चुकीचा निर्णय घेतला जाणार नाही. या प्रकरणात घटनेच्या चौकटीत बसणारा निर्णय घेतला जाईल, असे प्रतिपादन नार्वेकर यांनी केले.

पुनर्वसन कसे करणार? विधानसभा अध्यक्षांनी शिवसेनेच्या १६ आमदारांना अपात्र ठरवल्यास भाजपकडून आपले पुढील पत्ते उघड केले जाऊ शकतात. त्यामुळे येत्या आठवडाभरात महाराष्ट्रात महत्त्वपूर्ण राजकीय घडामोडी घडण्याची दाट शक्यता आहे. एकनाथ शिंदे यांना अपात्र ठरल्यामुळे मुख्यमंत्रीपदावरुन पायउतार व्हावे लागल्यास भाजप त्यांचे कशाप्रकारे पुनर्वनस करणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. मात्र, यानिमित्ताने पुन्हा एकदा मुख्यमंत्रीपदासाठी अजित पवार यांच्या नावाची चर्चा सुरु झाली आहे.

### भाजपसमोरचा पहिला पर्याय...

न्यायालयाच्या आदेशामुळे आता येत्या काही दिवसांमध्ये नार्वेकर यांना आमदारांच्या अपात्रतेसंदर्भात निकाल देणे अपरिहार्य आहे. पक्षांतर्गत बंदी कायद्यानुसार आणि दहाव्या परिशिष्टानुसार शिंदे यांच्यासह शिवसेनेचे १६ आमदार अपात्र ठरल्यास शिंदे-फडणवीस सरकारला मोठा धक्का बसू शकतो. खरीच अशी परिस्थिती उद्धवल्यास अकारण राजकीय अस्थैर्य निर्माण होऊ नये, यासाठी भाजपच्या गोटात रणनीती आखली जात आहे.शिंदे अपात्र ठरल्यास आताचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे मुख्यमंत्री म्हणून हा भाजप पुढचा पहिला पर्याय असेल. याशिवाय भाजपच्या गोटात मुख्यमंत्रीपदासाठी देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, यांच्यासह केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचीही नावे चर्चेत आहेत.

### वेट अँन्ड सी

अजित पवार यांनी राष्ट्रवादीतील आमदारांचा एक गट फोडून उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यापासूनच ते आगामी काळात मुख्यमंत्री होणार, अशी चर्चा सातत्याने सुरु आहे. अजितदादांच्या गटाचे आमदार मध्यंतरीच्या काळात उघड उघड यासंदर्भात बोलत होते. यावरुन एकनाथ शिंदे आणि त्यांच्या गटाचे आमदार नाराज झाले होते. तेव्हा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टीकरण देत आगामी काळात एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री असतील. त्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणालाही हे पद दिले जाणार नाही, असे फडणवीस यांनी म्हटले होते. मात्र, आता एकनाथ शिंदे यांच्यावर अपात्रतेची कारवाई झाल्यास देवेंद्र फडणवीस काय भूमिका घेतात, हे पाहावे लागेल.

### काल्पनिक शपथविधी

राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका पदाधिकाऱ्याने गणपतीसाठी आपल्या घरी साकारलेला देखावा. राष्ट्रवादी काँग्रेसच्या चित्रपट आणि सांस्कृतिक विभागाचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील यांच्या घरातील अजितदादांच्या शपथविधीचा देखावा अनेकांच्या चर्चेचा विषय ठरत आहे. या देखाव्यात अजितदादा पवार यांच्या मुख्यमंत्री पदाच्या शपथविधी दाखवला आहे. या काल्पनिक शपथविधीला फिल्मीस्टार व राजकीय नेत्यांची उपस्थिती दाखवल्याचे देखाव्यात दिसत आहे. त्यामुळे अजित पवार मुख्यमंत्री होणार का, याबाबतच्या चर्चेने जोर धरला आहे.



श्रीमंत मानाचा कसबा गणपतीतर्फे वाल्याचा वाल्मिकी या देखाव्याचे उद्घाटन शुक्रवारी पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांच्या हस्ते करण्यात आले.

## मंगळवेढा तालुक्यातील महाईसेवा केंद्राची बनवाबनवी उघड

### पोलीस भरतीसाठी खोटा दाखला दिला; तहसीलदारांनी केला गुन्हा दाखल

सुराज्य / सोलापूर

सरकारी कागदपत्रांमध्ये कोणताही फेरफार करण्याचा अथवा बदल करण्याचा अधिकार नसताना मंगळवेढा तालुक्यातील बोराळे येथील महाईसेवा केंद्रातून पोलीस भरतीसाठी ई डब्लू एसच्या दाखल्यासाठी दाखल झालेल्या कागपत्रांमध्ये फेरफार करत बनावट दाखला दिल्याने केंद्र चालक सुहास सूर्यकांत घोडके यांच्या विरोधात नायब तहसीलदार चंद्रकांत हेडगिरे यांनी गुन्हा दाखल केला आहे.

बोराळे येथे राहणाऱ्या तनुजा नकाते मुंबई पोलीसमध्ये भरती झाल्यानंतर त्यांची कागदपत्रे सत्यता पडताळणी करीता तहसील कार्यालयामध्ये आले असता कागदपत्राची तपासणी करतेवेळी आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठीचे प्रमाणपत्राचा (ई डब्लू एस) बारकोड चेक केले असता बारकोडमध्ये गणेशकर या नावाने दिसून येत असल्याने सदरचा दाखला बनावट असल्याचे निदर्शनास आले मंगळवेढा तालुक्यातील बोराळे येथील महाईसेवा चालक सुहास सूर्यकांत घोडके यांनी मूळ दस्तऐवजामध्ये तांत्रिक फेरबदल करुन बोगस प्रमाणपत्र दिले असल्याने याबाबत तहसीलदार यांच्याकडे शासनाच्या कागदपत्रामध्ये जाणिवपूर्वक तांत्रिक पध्दतीचा अवलंब करुन फेरफार केलेची तक्रार तनुजा तानाजी नकात यांनी केली तसा जबाव तहसीलदार यांना दिला. त्यामुळे केंद्र चालक सुहास सूर्यकांत घोडके यांच्या विरोधात नायब तहसीलदार चंद्रकांत हेडगिरे यांनी मंगळवेढा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

महाईसेवा केंद्र चालकाकडून दाखला काढतेवेळी केंद्र टोकन घ्यावे. दाखल्याकरीता ३३.६० पैसे फी आहे. यापेक्षा जास्त पैसे कोणीही देवू नये. मागणी केल्यास तक्रार करावी. सेवा केंद्राकडून दिला जाणा-या प्रत्येक दाखल्याची पडताळणी महा ऑनलाईन पोर्टलवर जावून बारकोड नंबर टाकून सत्यता पडताळणी करता येते. दाखल्याची पडताळणी करुन दाखला नागरिकांनी स्विकारावा म्हणजे भविष्यात अशी फसवणूक होणार नाही

**-चंद्रकांत हेडगिरे (नायब तहसीलदार मंगळवेढा)**

बनावट दाखला प्रकरणी प्रशासनाकडून गुन्हा दाखल होताच मंगळवेढा पोलिसांचे पथक बोराळे गावात जावून केंद्र चालक सुहास सूर्यकांत घोडके यांच्या घरी महासेवा केंद्रात जावून पाहणी केली मात्र घोडके फरार असल्याचे पोलिसाच्या वतीने सांगण्यात आले.

## विहिरीत विवाहितेची आत्महत्या

**सोलापूर** : विडीघरकुल परिसरातील विहिरीत एका ३९ वर्षीय विवाहित महिलेने उडी टाकून आत्महत्या केली. ही घटना गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली. महानंदा बाबू धोत्रे (वय ३९ रा.रविवार पेठ, शांतीनगर झोपडपट्टी) असे मयत झालेल्या विवाहितेचे नाव आहे. तिचा मृतदेह आज सकाळी सागर चौकातील म्हाडाच्या विहिरीत आढळून आला. महानंदा धोत्रे हिच्या पश्चात पती, दोन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे. आज पहाटे ५ वाजेच्या सुमारास घरातून गेली होती. घरातील लोकांनी शोध घेतला असता विहिरीजवळ तिच्या चपला आढळल्या. त्यानंतर पोलीस तसेच अग्निशामकच्या पथकाने तिचा मृतदेह विहिरीतून शोधून काढला. यापूर्वी तिने दोन वेळा आत्महत्येचा प्रयत्न केली होती.या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे. या मागचे कारण समजले नाही. हवालदार गायकवाड तपास करीत आहेत.

## उत्तर सोलापूर, मोहोळ तालुक्यातील २३ गावांमध्ये सापडल्या कुणबीच्या नोंदी

### निवासी उपजिल्हाधिकारी कांबळे यांची माहिती

सुराज्य / सोलापूर

उत्तर सोलापूर व मोहोळ या दोन तालुक्यातील २३ गावांच्या जुन्या दप्तरात मराठा कुणबी संदर्भातील नोंदी आढळून आल्या असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे यांनी दिली.

बार्शी, उत्तर सोलापूर, मोहोळ व माढा या चार तालुक्यातील अनेक गावांतील नागरिकांनी मराठा कुणबी संदर्भातील रेकॉर्ड तपासणी करण्याची मागणी केली होती. स्वातंत्र्यापूर्वी या चार तालुक्यातील गावे निजामशाहीत होती तर स्वातंत्र्यानंतरही तुळजापूर तालुक्यात ही गावे होती. त्यामुळे या तिन्ही तालुक्यातील गावात मराठा कुणबीचा संदर्भ असल्याची माहिती प्रशासनाकडे सादर करण्यात आली होती. प्रशासनाने शोधलेल्या जुन्या रेकॉर्डमध्ये २३ गावातील मराठा कुणबीचा संदर्भ आढळून येत असल्याने या गावातील मराठा समाजाला मराठा कुणबीचे दाखले मिळण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे सांगण्यात येते. निजामशाही काळातील संबंध जोडणारे अनेक पुरावे सोलापूर जिल्ह्यातील अनेक गावात आहेत. त्यामुळे या संदर्भाची व जुन्या रेकॉर्डची तपासणी करुन मराठा कुणबीसंदर्भात शोध मोहीम आणखी गतीने करण्यात यावी, अशी मागणी यानिमित्ताने समोर येत आहे.

## सोलापूर शहराला आज उशिरा पाणीपुरवठा

**सोलापूर** : उजनी येथील पंप गृहास होणारा विद्युत पुरवठा खंडित झाल्याने सोलापूर शहराचा शुक्रवार दि. २२ सप्टेंबर २०२३ रोजीचा पाणी पुरवठा उशिरा, कमी वेळ व कमी दाबाने होणार आहे.

सोलापूर शहरास पाणी पुरवठा करणाऱ्या टाकळी हेड वर्क्स पंप हाऊस महाराष्ट्र राय विद्युत मंडळाकडून होणारा विद्युत पुरवठा वादळ वाऱ्यामुळे व पावसामुळे दि. २१ सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता पासून खंडीत झालेला होता. तसेच उजनी येथील पंप गृहास होणारा विद्युत पुरवठा दि.२१ सप्टेंबर रोजी संध्या ५ वाजता पासून खंडीत झालेला होता. या दोन्ही पंपगृहास होणारा विद्युत पुरवठा खंडीत झाल्याने शहर पाणी पुरवठा करीता टाकळी हेड वर्क्स व उजनी हेड वर्क्स येथून पुरेशा प्रमाणात पाण्याचा उपसा होऊ शकला नाही. त्यामुळे सोलापूर शहराचा शुक्रवार दि. २२ सप्टेंबर २०२३ रोजीचा पाणी पुरवठा उशिरा, कमी वेळ व कमी दाबाने होणार आहे. नागरीकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करुन सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



महागाई, दुष्काळ, अतिवृष्टी हे सामान्य माणूस किती दिवस सहन करणार?


कल्याण
368-70-136

मुंबई
679-25-249


## सोनपावलांनी गौरींचे आगमन; स्वागताला वरूण राजाचीही हजेरी

सुराज्य / सोलापूर

**विघ्नहर्ता गणरायाचे धूमधडाक्यात आगमन झाल्यानंतर शुक्रवारी सोलापुरात घरोघरी गौरींचेही सोनपावलांनी आगमन झाले. विशेष म्हणजे गौरीच्या आगमनाला वरूणराजानेही हजेरी लावल्याने सोलापूरकरांचा आनंद द्विगुणीत झाला. गौरी कशाच्या पाऊली आली, सोन्या-मोत्याच्या पाऊली आली', असे म्हणत गौराईला वाजत-गाजत उत्साहाच्या वातावरणात घरी आणून स्थापना करण्यात आली.**



गणरायाच्या आगमनानंतर सर्वत्र गौरींच्या आगमनाची चाहूल लागली होती. यासाठी महिला गेल्या काही दिवसांपासून विविध कामात मग्न होत्या.गौरी आणण्याचा दुपारी साडेतीन वाजेपर्यंत मुहुर्त होता. त्यामुळे महिला सकाळपासूनच गौरींच्या स्वागतासाठी आतूर झाल्या होत्या. गौराईचे पारंपरिक पद्धतीने आणि सोनपावलांनी आगमन झाल्यानंतर महिलांच्या उत्साहाला उधाण आले. गौरीला सजविण्यासाठी, तिला साजशृंगार करण्यासाठी महिलांनी विशेष परिश्रम घेतले. सायंकाळपर्यंत गौरींना बाजूबंद, लक्ष्मीहार, सुवर्णजडीत कंबरपट्टे, बोरमाळ, हार तसेच सोन्याचे विविध प्रकारचे दागिने घालून सजवण्यात आले. दुसऱ्या दिवशी शनिवारी गौरींचे पूजन करण्यात येणार आहे. यावेळी काही घरांत पुरणाच्या पोळीच्या नैवेद्यासोबत जेवणाचा बेत आखण्यात येणार असून, वेगवेगळ्या कुटुंबांतील परंपरेनुसार गोड, तिखट, फळांचा नैवेद्य गौराईला दाखवण्यात येणार आहे.

### मुस्लीम कुटुंबियांच्या घरीही गौरीचा पाहुणचार



बार्शी तालुक्यातील तडवळे येथे शेख-कोतवाल कुटुंबीयांच्या गौरीचा पाहुणचार पाहायला मिळला.हे कुटुंब तब्बल शंभार वर्षापासून हिंदू संस्कृतीप्रमाणे गौरीची मनोभावे पूजा करीत आहे. अल्लाउद्दीन सुलेमान शेख-कोतवाल यांच्या घरी अनुराधा नक्षत्रावर गौरींचे आवाहन करण्यात आले. अल्लाऊद्दीन यांचे आजोबा तब्बूलाल कोतवाल रामभक्तीची वचने, अभंग म्हणून दिवसाची सुरुवात करीत असत. पुढे सुलेमान शेख-कोतवाल यांनी परंपरा कायम ठेवत घटस्थापना, दीपावली, अल्लाऊद्दीन यांच्यासह त्यांच्या पत्नी बिसमिल्ला, मुले अंजूम, परवीन, कलिम, खुशी यांचा गौरी पूजनात सहभाग असतो. मूर्तीची आरास, खेळणी, रोषणाई आदी कामे रात्रभर जागून केली जातात. या गावातील याकूब मुजावर आणि रफिक आतार यांच्या घरी भक्तिभावाने गौराईचे पूजन होऊन नैवेद्य दाखविले जाते. अक्कलकोट तालुक्यातील सिंदखेड गावात अयुब बाबूलाल पठाण यांच्या घरी पूर्वापार परंपरेने गौरीपूजन करण्यात संपूर्ण पठाण कुटुंबीय तल्लीन होते. शहरानजीक देगाव तांड्यावर राहणारे नजीर सय्यद यांच्या घरीही गौरी प्रतिष्ठापनेची परंपरा कायम आहे.